# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजूला उस्मानपुरा,
पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
http://www.dteau.org E-mail:- roaurangabad@dtemaharashtra.gov.in


परिपत्रक/तात्काळ कालमर्यादा — जावक क्र.विकाऔ/लेखा-१/२०१७/4432

**स्मरण पत्र-१** — दि. 28 NOV 2017

प्रति,

प्राचार्य,

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद/शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद
शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद/जालना/अंबड,जि.जालना/जिंतूर जि.परभणी/नांदेड/हिंगोली/उस्मानाबाद/बीड
पु.ला.शासकीय तंत्रनिकेतन, औसा रोड,लातूर/ शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन,बार्शी रोड लातूर.

**विषयः-** **अखर्चित असलेल्या भारत सरकार शिष्यवृत्ती व इतर शिष्यवृत्त्या बाबतची माहिती पाठविणे बाबत.**

संदर्भः- या कार्यालयाचे पत्र क्र.विकाऔ/लेखा-१/२०१७/३५०४ दि.२१-०९-२०१७

उपरोक्त संदर्भिय विषयी आपणांस कळविण्यात येते की, संस्थेच्या प्राचार्य यांच्या वैयक्तिक लेखा खाते व बँक खात्यावर शिल्लक असलेल्या शासनाच्या विविध शिष्यवृत्या (समाज कल्याण विभाग/ आदिवासी विभाग विभाग/ अपंग शिष्यवृत्ती/ अल्पसंख्यांक विभाग शिष्यवृत्ती/ खुल्या प्रवर्ग शिष्यवृत्ती इत्यादी) **३१ मार्च, २०१६, ३१ मार्च,२०१७ व ३१ ऑगस्ट,२०१७** पर्यंतच्या शिल्लक असलेल्या/ वितरीत न झालेल्या शिष्यवृत्तीचे वर्षनिहाय माहिती या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावी. याबाबत उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आलेले होते.

अद्यापपर्यंत फक्त शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर/नांदेड व पु.ला.शासकीय तंत्रनिकेतन,लातूर या संस्थांची माहिती या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. त्यापैकी जिंतूर व पु.ला.शासकीय तंत्रनिकेतन,लातूर संस्थांची शिल्लक रक्कम **निरंक** आहे. शासकीय तंत्रनिकेतन,नांदेड या संस्थेच्या खात्यावर रक्कम शिल्लक असल्याचे कळविले आहे, या संस्थेने तात्काळ रक्कम संवितरीत करावी. उर्वरीत संस्थांची माहिती अद्यापही या कार्यालयास अप्राप्त आहे.

**उपरोक्त शिष्यवृत्यांची शिल्लक असलेली/वितरीत न झालेली संपुर्ण रक्कम संबंधितास अदा करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही दि.१५-१२-२०१७ पर्यंत करण्यात यावी. व केलेल्या कार्यवाहीचा दि.२२-१२-२०१७ पर्यंत या कार्यालयास सादर करावा.**

सदरील शिल्लक असलेली / वितरीत न झालेल्या शिष्यवृत्तीच्या रकमेबाबत विलंबाने होत असलेल्या कार्यवाही बाबत संबधित संस्थेचे प्राचार्य/ संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची जबाबदारी राहील याची नोंद घेण्यात यावी, व त्यादृष्टीने प्रकरणाचे गांभीर्य विचारात घेवून तात्काळ प्रथम प्राध्यान्याने रकमा संवितरीत करण्याची कार्यवाही करावी.

(महेश शिवणकर)
**प्र.सहसंचालक**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद**

प्रतः- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.